International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# स्वातंत्र्योत्तर काळातील बंजारा समाजाची सामाजिक स्थिती

अरुण तुळशीराम हागे

संशोधक विद्यार्थी, नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेरा (रेल्वे), अमरावती.

मानवाचा इतिहास कालभ्रमंती मधून उदयाला आलेला आहे. पूर्वी सतत भ्रमंत करीत असलेला मानव प्राणी स्वतःच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करावयास लागल्यानंतर कुठेतरी स्थिर होवू लागला. भारतामध्येही समाज निर्मिती अशाच प्रकारे झाली. भारतामध्ये काळाच्या गरजेनुसार समाज विभागणी होऊन समाज रचनेत धर्माप्रमाणेच वर्ण व्यवस्थेला देखील महत्त्व आले आणि प्राचीन काळापासून आजही ते टिकून आहे.

श्रमतत्व आणि वास्तव्य जीवन पद्धतीवरून भारतीय समाज रचना चार प्रकारात विभागलेली आहे. यामध्ये प्रथम येतो तो कोणत्याही भागात स्थिर वास्तव्य करून असलेला समुदाय ज्याला आज गाव म्हणून ओळखले जाते. स्थिर वास्तव्य करून असलेला, आपली कामे इतरांकडून स्वतःसाठी करून घेणारा आणि वर्णव्यवस्थेप्रमाणे उच्चवर्णीय समजला जाणारा स्थिर समुदाय म्हणजे स्पृश्य समाज. दुसरा तो जो स्थिर वास्तव्य करतो परंतु गावाबाहेर राहतो. ज्याला कनिष्ठ स्वरूपाची कामे करावी लागतात इतरांकडून कनिष्ठ किंवा अस्पृश्य गणला गेलेला समाज. तिसरा समाज जो गावापासून दूर पण डोंगर कपारीत, दऱ्याखोऱ्यामध्ये राहतो तो आदिवासी समाज आणि चौथा वर्ग म्हणजे ज्यांचे स्वतःचे वास्तव्याचे ठिकाण नाही, जो चरितार्थासाठी भटकतो, सातत्याने भटकंती करतो, असे करताना गुरेढोरे, पशुधन स्वतःसोबत बाळगतो, रानोमाळ भटकतो, कोणतेही निश्चित ठिकाण वास्तव्य नसते असा भटका समाज आणि याच भटक्या समुदायात येतो तो बंजारा समाज जो आज गोरबंजारा म्हणून भारतामध्ये सर्वत्र स्थायिक झालेला आहे.[1] याच बंजारा समाजाची स्वातंत्र्योत्तर काळातील असलेली सामाजिक स्थिती, सामाजिक त्यांचा दर्जा, त्यांचे राहणीमान, चालीरीती, प्रथा, परंपरा याबद्दल माहिती जाणून घेणे हा या शोधनिबंधाचा मानस आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये -

1. बंजारा समाज म्हणजे नेमका कोणता समाज हे जाणून घेणे.
2. भारतातील बंजारा समाजाची स्थिती अभ्यासणे.
3. बंजारा समाजाची स्वातंत्र्योत्तर काळातील वाटचाल समजून घेणे.
4. स्वातंत्र्योत्तर काळातील बंजारा समाजाच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेणे.
5. वर्तमान काळातील बंजारा समाजाची सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.

बंजारा समाज -

ऐतिहासिकदृष्ट्या पाहता इतर कोणत्याही समाजाला जेवढा दीर्घकालीन ऐतिहासिक वारसा लाभला आहे तेवढाच आदिम, भटक्या व विमुक्त समाजाच्या ही वाटेला आलेला आहे. 'विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर' अशी एक म्हण प्रचलित आहे.

ही म्हण बहुदा स्थलांतर करणाऱ्यांकरिता वापरली जाते. अशा निरंतर स्थलांतर करीत राहणाऱ्या काही प्रमुख जमाती भारतात वर्षानुवर्ष आहे. त्यांच्या वैशिष्ट्यामुळे ते स्वतःचे अस्तित्व टिकवून आहे. असेच काहीशी वेगळेपण जाणवणाऱ्या समाजापैकी एक गोरबंजारा समाज आहे. त्यांचा मूळ व्यवसाय 'लदेणी' (बैलाच्या पाठीवर सामान लादून भटकंती करत त्यांची विक्री करणे) तसेच पशुपालन हा मानला जातो. पाण्याची सोय आणि निचरा होणारी पठाराची जागा पाहून काही दिवस त्या ठिकाणी त्यांचे वास्तव्य राहते त्याला 'तांडा' असे म्हणतात. कुठल्याही जाती व्यवस्थेमागे त्यांची विशिष्ट परंपरागत रचना असते. त्यांचा पूर्व इतिहास आणि जाती व्यवस्थेची चौकट, जातीची लोकसंख्या, जातीतील विविध संस्कार व रितीरिवाज यामुळे देखील त्यांच्या राजकीय सहभागावर कमी अधिक परिणाम होत असतो त्यामुळे बंजारा समाजाबद्दल जाणून घेणे आवश्यक आहे.[2]

बंजारा या शब्द उत्पत्तीबद्दल अनेक मतप्रवाह आहेत. बंजारा लोकांना बंजारी, बनजारा, ब्रिंजारी, लमाण, लमाणी, लंबाडी, लंबाडा, लंबाडोह, सुकळी इ. अनेक नावे आहेत. संस्कृत रातील वाणिज्य म्हणजे व्यापार या शब्दावरून बजन किंवा वनज हा शब्द निघाला व त्यावरून या लोकांचा बंजारा किंवा बनजारा हे नाव मिळाले तसेच हे लोक लवण म्हणज मीठ वाहून नेत असत म्हणून त्यांना 'लमाणी' असेही नाव पडते.[3] भारतामध्ये सर्वत्र विखुरलेल्या बंजारा समाजाची सामाजिक स्थिती त्यांची वाटचाल जाणून घेणे गरजेचे आहे.

बंजारा समाजाची सामाजिक स्थिती -

भारतात प्राचीन काळापासून पंचायत व्यवस्था अस्तित्वात असल्याचे आढळते. जात पंचायत हा देखील जातीचा कारभार पाहणारा वर्ग पूर्वीपासून प्रचलित आहे. स्वातंत्र्यानंतर बंजारा ही जात स्थिर होत आहे. भारतीय राज्यघटनेनुसार सर्व नागरिक समान आहेत. जात, धर्म, पंथ इ. वरून भेदभाव करण्यास कायदेशीररीत्या प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यामुळे जनगणना करताना फक्त धर्म, भाषा, अनुसूचित जाती आणि जमाती अशी वर्गीकरणात्मक जनगणना होत असते. जातीनिहाय जनगणना होत नसल्याने बंजारा जातीची भारतातील अधिकृत लोकसंख्या उपलब्ध नाही. बांजारा जातीची मूळ प्रवृत्ती भटक्या समूहाची होती. आजही उदरनिर्वासाठी किंवा शेतीचा हंगाम झाल्यानंतर ऊस तोडणीच्या कामासाठी बंजारा सहकुटुंब भटकंती करतात. या भटक्या समूहालाच तांडा असे म्हणतात. भटक्या जीवनाला भीती नस,ते त्याचे सारेच काही मुक्त असते परंतु त्यांची स्वतःची अशी एक विशिष्ट समाज व्यवस्था असते. ज्यामध्ये जबाबदारीचे वाटप झालेले असते. बंजारा समाजाबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी बंजारा समाजाची समाजव्यवस्था अभ्यासणे गरजेचे आहे.[4]

टोळी स्वरूपात (तांडा) राहणाऱ्या बंजारा लोकांचा एक नायक असतो त्याला 'नाईक' असे म्हणतात. नाईकाचे आपल्या तांड्यावर पूर्ण नियंत्रण असते. तांड्यातील सभासदाला कोणताही त्रास होऊ नये याकरीता नाईक सतत परिश्रम घेत असतो. त्यामुळे तांड्यातील लोक त्यांचा आदर करतात. आपले आचार-विचार व कृतीचा आदर्श तो तांड्यातील लोकांसमोर ठेवत असतो. बंजारा तांड्याचा संपूर्ण कारभार नाईकांना बघावा लागत असतो. तांड्याची ओळख सुद्धा नाईकावरूनच होत असते. नाईक म्हणजे तांड्याचा राजा म्हटलं तरी चालेल. तांड्यातील तंटे मिटवण्याचे अधिकार हा नाईकाकडे देण्यात आलेला आहे. तांद्यात्त करायच्या प्रत्येक गोष्टीची परवानगी नाईकांकडून घ्यावी लागते. नाईकांनंतर जो दुसरा महत्त्वाचा व्यक्ती असतो तो म्हणजे कारभारी. नाईकांनी दिलेल्या आदेशाचे पालन होते किंवा नाही हे पाहण्याचे काम कारभारी करीत असतो. कारभाऱ्याला तांड्यामध्ये विशेष महत्त्व असते. नाईक व कारभारी यांनी सांगितलेले काम करण्यासाठी एक सेवक असतो. त्याला 'ढालीया' म्हणतात. लग्न किंवा मंगल प्रसंगी डफ वाजविणे, तांडा बैठकी संबंधीचे निरोप सर्वांपर्यंत पोहोचविणे, नायकाचा आदेश तांड्यातील सर्व व्यक्तीपर्यंत पोहोचविणे इत्यादी कनिष्ठ स्वरूपाची कामे सुद्धा तो करतो.[5] तांड्यातील शाहीर

स्वरूपाचे कार्य करणारी व्यक्ती म्हणजे थाळी. त्यांना तांड्याचा व तांड्यातील व्यक्तीचा, वंशावळीचा इतिहास तोंडपात असतो. तांड्याच्या इतिहासात होऊन गेलेल्या कर्तुत्ववान व्यक्तीवर गोरबोलीत गाणे रचने, गाणे म्हणणे हे थाडी लोकांचे कार्य असते. नाईक, कारभारी यांना वेळोवेळी अडचणींमध्ये सल्ला देण्यासाठी तांड्यात काही विशिष्ट वृद्ध मंडळी असतात त्यांना डायसाळे म्हणतात. ही वृद्ध मंडळी नाईक, कारभाऱ्याला सल्ला देत असते. बंजारा स्त्री-पुरुष विविध प्रकारचे दागिने व आभूषणे पारंपरिक पद्धतीने वापरत असतात. बंजारा स्त्रियांना विशेषत: दागिन्यांची आवड असते. ती आपले संपूर्ण शरीर दागिन्यांनी भरून घेते त्यामुळे तांड्यांमध्ये एक तरी सनार असतोच. सनार म्हणजेच सोनार. पूर्वीच्या काळी दुसऱ्या कुठल्याही गावातून एखाद्या लहान मुल पळून आणीत आणि त्याला तांड्यात वाढविले जाई अशा मुलांना जांगड म्हणत. प्रत्येक नाईक, कारभारी यांच्याकडे एक तरी जांगड असे. ते मुल तांडातच राहून मोठे झाले की तांड्यातील एखाद्या मुलीशी त्याचा विवाह करून जांगड मुलाच्या सात पिढ्यानंतर त्याला बंजारा जातीत सामावून घेतले जाईल.[6]

तांड्यातील हरकामे आणि केस कापण्याचे काम नावी करीत तर गोरबंजारांच्या लग्नकार्यात सारंगीवर गाणे गाऊन मनोरंजन करणे, गोरबंजाराची पिढी सांगणे, वंशावळ सांगणे इ. काम भाट करीत. तांड्यातील न्याय निवाडा करण्याची पद्धत म्हणजे जात पंचायत. तांड्यातील भांडण-तंटे तेचप्रसंग सोडविण्यासाठी नायकाच्या मदतीला कारभारी सह एक पंचमंडळ असे त्याला जात पंचायत म्हणत.[7] या सर्वांच्या मदतीने तांड्यातील सामाजिक कारभार चालवल्या जात असे. कृषी व पशुधन सांभाळण्याकरता जंगलात डोंगरदऱ्याजवळ शहरी भागापासून दूर अंतरावर बंजारा समाज स्थिर झालेला आहे.

त्यांची घरे ही कुडांची, विटा - मातीची आणि सिमेंटचे सुद्धा बांधलेली दिसून येतात. इतर जाती-धर्माप्रमाणे यांचे ही दिवाळी, होळी, तीज, दसरा हे सण तसेच भाऊबीज, अक्षयतृतीया, रक्षाबंधन हे सन ही साजरे करतात. पोहरागड येथील संत सेवालाल महाराज हा एकमेव बंजारा समाज पुरुषाला बंजारा जातीचे लोक गुरुस्थानी मानतात. बंजारा जातीत अनेक देव-देवतांची पूजा केली जाते. ज्यामध्ये तुळजाभवानी कालिकामाता, मरिअम्मा, बालाजी ही बंजारांची कुलदैवते तर सतीमाता, मर्याम्मा, सगुना, विराटण, मावली इ. देवीचे रूपे मानतात. त्यांची उपासना केली जाते. मेकाळी देवता महाकालीचे प्रतिरूप मानले जाते. बंजारा जातीत देवीच्या पुजाऱ्याला भगत असे म्हणतात. शुभ-शकुन, स्वप्न इत्यादी सांगणारा किंवा मंत्रतंत्र जाणणाऱ्या व्यक्तीला जाणीया असे म्हणतात. जाणीयाला समाजातील दृष्ट प्रवृतीतील डाकीण, चेटकिण, जादुविद्या धारण करणाऱ्या व्यक्तीच्या शोध लावणे व दंड करण्याचे सामर्थ असणाऱ्या आहे असे मानले जाते.

या समूहातील लोकांना संगीत आणि नृत्याची आवड आहे. या समाजातील लोक हे उंच मध्यम बांधायचे, गोरे आणि सावळ्या वर्णाचे काटक, बळकट असतात. पुरुष धोतर किंवा चोळणा त्यावर अंगरखा आणि डोक्याला पांढरे किंवा रंगीत पागोटे असा पोशाख करतात. स्त्रिया ह्या पारंपरिक पोशाखात असतात. लाल, निळ्या रंगाचा घागरा त्यावर भडक रंगाची बंजारा पद्धतीची सैल चोळी घालतात. तिला काचोळी म्हणतात. केसांमध्ये झुमके अडकून ते दोन्ही गालाभोवती लोंबकळत असतात. हातात कोपऱ्यापर्यंत हस्तिदंताच्या किंवा पितळेच्या बांगड्या असतात. नाकात नथनी, पायात चाडे, कडे, पितळी पैजन असते. डोक्याच्या केसांमध्ये मधून चांदीचे टोपली किंवा घुंगडी नावाचा दागिना हा विशिष्ट साखळीमध्ये गुंफून गालावर सोडलेला असतो. गळ्यातही पुतळ्याच्या व इतर माळा असतात. मुली सहा-सात वर्षाच्या झाल्या की त्यांच्या ओढणीच्या दोन्ही टोकाला तांदूळ, कवळ्या व सुपारी यांची एकेक पुरचंडी बांधतात. ही अविवाहित मुलीची खूण असते. विवाहित स्त्रिया माथ्यावर केसाच्या गुंफेत नऊ ते पंधरा इंच लांबीचे शिंग किंवा काठी खोवत व त्यावरून ओढणी घेतात. यांचा आहार हा शाकाहारी व मांसाहारी दोन्ही पद्धतीचा असतो. यांची बोलीभाषा ही गोरबोली आहे. या गोरबोलीला स्वतःची लिपी नाही. अशाप्रकारे बंजारा समूह त्यांच्या सामाजिक प्रथा परंपरेने जगत आलेला आहे. ज्यामध्ये आज परिवर्तन होऊन समाज जागृती झालेली आहे.

निष्कर्ष -

आज 21 व्या बंजारा समाज स्थिर झालेला आहे. त्यांची तांडा वस्ती आता गावामध्ये, शहरामध्ये रूपांतरित झालेली आहे. त्याच्यामध्ये आलेल्या अनिष्ट प्रथा, परंपरा संपुष्टात येऊन समाजातील अंधश्रध्दा शिक्षणामुळे कमी झालेली आहे. आणि तांडा वस्ती स्थिर झाल्याने मुले पळून आणण्याचे अर्थात जांगड मुलांचे प्रमाण संपुष्टात आलेले आहे आणि बंजारा समाजातील जांगड ही प्रथा कायमस्वरूपी बंद झालेली आहे. अशा अनेक कुप्रथा संपुष्टात आलेल्या आहे. बंजारा समाजातील समाजसुधाकांनी, शिक्षितांनी या समाजाच्या उत्थानासाठी अथक प्रयत्न केलेले आहे. ज्यामुळे आज बंजारा समाज हा सर्व सामान्य समाजामध्ये समरस होऊन जीवन जगत आहे.  आज या समाजाने सर्वच क्षेत्रात प्रगती करून आपल्या कार्य कर्तृत्वाचा ठसा सर्वत्र उमटविला आहे. आजचा प्रगत बंजारा समाज भारतामध्ये जवळ जवळ सर्वच क्षेत्रात नेतृत्व करीत आहे.

तळटीपा -

1. गर्गे स. मा. (संपा.) - भारतीय समाज विज्ञान कोश (खंड 3 रा), 1989. पृष्ठ क्र. 392.
2. साठे, डॉ. स्मिता - बंजारा - परिवर्तनाचा वाटसरू, वैदही पब्लिकेशन, दस्तुर नगर, अमरावती. 26 मे 2021. पृष्ठ क्र. 3.
3. जोशी, महादेवशास्त्री (संपा.) - भारतीय संस्कृती कोश (खंड 3 रा) 1970 पृष्ठ क्र. 23.
4. पवार, प्राचार्य, डॉ. प्रमोद मनोहर - बंजारा समाज : राजकीय आणि सामाजिक सहभाग, अथर्व पब्लिकेशन, धुळे. द्वितीय आवृत्ती 20 सप्टेंबर 2016. पृष्ठ क्र. 46,47.
5. बनसोड, डॉ. संतोष - "यवतमाळ जिल्ह्याचा इतिहास", आधार पब्लिकेशन अमरावती, प्रथम आवृत्ती - फेब्रुवारी 2021. पृष्ठ क्र. 112.
6. रसेल, आर. व्ही. अँड हिरालाल - द ट्राईब्ज अँड कास्ट ऑफ द सेंट्रल प्रोव्हीजन्स ऑफ इंडिया (खंड दुसरा),1975. पृष्ठ क्र. 183.
7. राठोड, मोतीराज - गोरमाटी, वर्ष 1997. पृष्ठ क्र. 41.